**<u>निशाण क्रमांक १९ वरील आदेश</u>**

**(दिनांक ०६/०५/२०२५)**

प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दाखल केला असून, मौजे कुसमोड, ता. माळशिरस, जि. सोलापुर येथील शेतजमिन गट क्रं. १५०/२क, क्षेत्रफळ १.८५ हे. आर. पोटखराब ०.१५ आर, आकार १.०० रु.पैसे या जमिनीमध्ये तसेच खालील वर्णनाची ट्रॅक्टर व ट्रॉली

१. एम.एच.१३/जे.८४३५ (महिंद्रा कंपनीचा ४५ एच.पी.चा लाल रंगाचा ट्रॅक्टर)
२. एम.एच.१३/ए.८५१२ (महिंद्रा कंपनीचा ४५ एच.पी.चा लाल रंगाचा ट्रॅक्टर)
३. एम.एच.४५/एफ.४५४८(महिंद्रा कंपनीचा ६०एच.पी.चा लाल रंगाचा ट्रॅक्टर)
४. एम.एच.४५/एफ.४९६३(महिंद्रा कंपनीचा ६०एच.पी.चा लाल रंगाचा ट्रॅक्टर)
५. एम.एच.४५/एफ.०३०७(महिंद्रा कंपनीचा ६०एच.पी.चा लाल रंगाचा ट्रॅक्टर)
६. एम.एच.४५/ई.१५४३ (लाल रंगाची दोन चाकी डंपीग ट्रॉली)
७. एम.एच.४५/ई.८२६ (लाल रंगाची दोन चाकी डंपीग ट्रॉली)

८. एम.एच.४५/ई.१५३८ (भगव्या रंगाची चार चाकी ट्रॉली)

९. एम.एच.४५/ई.१५३९ (भगव्या रंगाची चार चाकी ट्रॉली)

१०. दोन विना नंबरच्या चार चाकी ट्रॉल्या.

वरील वर्णनाच्या शेतजमिनीच्या कब्जेवहिवाटीस वादींनी अगर त्यांच्यामार्फत इतर कोणीही हरकत अडथळा करु नये, तसेच वर उल्लेखीत वाहन वापरण्यास प्रतिवादीला वादींनी हरकत अडथळा करु नये, अशी वादी विरुद्ध तूर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्याकामी दाखल केला आहे.

वरील शेतजमिन व वाहने हा प्रस्तुत अर्जाचा विषय आहे. त्यास यापुढे सोयीकरीता 'दावा जमिन व दावा वाहने' असे संबोधण्यात येत आहे.)

**प्रतिवादीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे :–**

**२.** वादी क्रं. १ ते ४ प्रतिवादीची मुले व मुली असुन वादी क्रं. ५ ही पत्नी आहे. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दावा जमिन व एकत्र कुटुंबाच्या इतर मिळकतींमध्ये वाटपाकरीता नियमित दिवाणी दावा क्रं. ८५५/२०१७ दाखल झाला होता. या

दाव्यात सन २०१७ साली लोकन्यायालयात तडजोड होवुन वाटप झालेले आहे. सदर तडजोडीनुसार दावा जमिन प्रतिवादीच्या हिश्श्यावर आलेली आहे. सदर दाव्यामध्ये हुकूमनामा होवुन त्याप्रमाणे फेरफार झाला व दावा जमिनीचा ७/१२ उतारा प्रतिवादीच्या नावाने झाला.

३. जुन २०१७ पासुन प्रतिवादी व वादी क्रं. ५ मध्ये कौटुंबिक कलह झाले. तेंव्हापासुन वादी प्रतिवादीपासुन वेगळे राहत आहेत. दावा जमिनीमध्ये असलेला ३ एकर तुटुन जाणारा उभा ऊस दिनांक २६/०४/२०२३ रोजी वादी क्रं. १, २ व ५ यांनी पेटवुन दिला व प्रतिवादीचे अंदाजे रक्कम रुपये ५,००,०००/– चे नुकसान केले. त्याबाबत प्रतिवादीने पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला व त्याबाबतचे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे. प्रतिवादीला लिहिता वाचता येत नाही. फक्त सही करता येते. प्रतिवादीचा ऊसतोडणी वाहतुक करुन कारखान्यात पाठविण्याचा व्यवसाय आहे. त्या व्यवसायाकरीता त्याच्याकडे दावा वाहने आहेत. वादी सदर वाहने वापरण्यास व दावा जमिनीमध्ये वहिवाट करण्यास प्रतिवादीला अडथळा करतात. त्यामुळे प्रतिवादीला ऊसतोडणी वाहतुकीचा व्यवसाय व शेती करणे अशक्य झाले

आहे. त्यामुळे प्रतिवादीने प्रतिदावा दाखल करुन त्यामध्ये प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन तुर्तातुर्त ताकीद मिळण्याची विनंती केली आहे.

**४.** वादींना पुरेशी संधी देवुन देखील त्यांनी अर्जास म्हणणे सादर केलेले नाही. त्यामुळे दिनांक २३/०४/२०२५ रोजी प्रस्तुत अर्जावर आदेश पारीत करुन प्रस्तुतचा अर्ज वादींच्या म्हणण्याशिवाय पुढे चालविणेत आला.

**५.** प्रतिवादी यांच्या कथनांवरुन व त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन पुढील मुद्दे माझ्या विचारात उपस्थित झाले. सदर मुद्दयांवरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **उत्तर** |
|---|---|---|
| १. | प्रतिवादीला सकृत दर्शनी केस आहे ? | **होय** |
| २. | न्यायाचा समतोल प्रतिवादीच्या बाजूने झुकतो का? | **होय** |
| ३. | अर्ज नाकारलेस प्रतिवादीचे अपरिमित नुकसान होणार आहे का? | **होय** |
| ४. | अंतिम आदेश काय? | **अर्ज मंजूर करण्यात येतो.** |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रमांक १ ते ३ करीताः–

६. मुद्दा क्रमांक १ ते ३ करीता आवश्यक तथ्ये व दस्ताऐवज एकसारखेच असल्याने वरील तिन्हीं मुद्दे चर्चा करण्याकरीता एकत्रीत घेतली आहेत.

७. प्रतिवादीचे असे कथन आहे की, दावा जमिन व त्याच्या कुटुंबातील इतर शेतजमिनीच्या वाटपाकरीता नियमित दिवाणी दावा क्रं.८५५/२०१७ दाखल झाला होता. तो दावा वादी क्रं. ३ व ४ यांनी प्रतिवादी व वादी क्रं. १, २ व ५ विरुध्द वाटपाकरीता दाखल केला होता. प्रस्तुत दाव्यामध्ये वादी व प्रतिवादींमध्ये तडजोड होवुन हुकूमनामा पारीत झाला होता. त्यानुसार दावा जमिन प्रतिवादीच्या वाटयाला आली आहे. प्रतिवादीने यादी निशाणी क्रं. २९ सोबत फेरफार क्रं. ४८४७ दाखल केलेला आहे. त्यानुसार असे दिसुन येते की, दिनांक ०९/०९/२०१७ रोजी वरील दाव्यामध्ये तडजोड होवुन हुकूमनामा पारीत झालेला आहे. त्यानुसार दावा जमिन प्रतिवादीच्या वाटयाला आलेली आहे. त्यानुसार दावा जमिनीच्या ७/१२ सदरी मालक म्हणुन प्रतिवादीचे नाव नोंदविण्यात आलेले आहे.

८. प्रतिवादीने यादी निशाणी क्रं. १८ सोबत दावा वाहनांचे नोंदणी प्रमाणपत्र दाखल केलेले असुन सदर वाहने प्रतिवादीच्या नावाने असलेले दिसुन येते. प्रतिवादीचे असे कथन आहे की, वादी दावा जमिन प्रतिवादीला वहिवाटु देत नाही. तसेच दावा वाहने वापरण्यास सुद्धा अडथळा करतात.

९. प्रतिवादीने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, दावा जमिन प्रतिवादीला नियमित दिवाणी दावा क्रं.८५५/२०१७ मध्ये पारीत झालेल्या हुकूमनाम्यानुसार मिळाली असुन त्याच्या नावे ७/१२ सदरी मालक म्हणुन नोंद झालेली आहे. तसेच दावा वाहने सुद्धा प्रतिवादीच्या नावाने असुन दावा जमिन वहिवाटण्यास व दावा वाहने वापरण्यास प्रतिवादी पात्र आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी केस प्रतिवादीच्या बाजुने जाते. असे असताना, जर वादींना दावा जमिन व दावा वाहने वहिवाटण्यास व वापरण्यास अडथळा करण्यापासुन थांबविले नाही तर प्रतिवादी दावा जमिन व दावा वाहने वहिवाट व वापर करु शकणार नाही व त्यामुळे त्याचे नुकसान होईल. त्यामुळे मुद्दे क्रं. १ ते ३ करीताचे निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ करिताः–**

**१०.** वर नमुद केल्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबी प्रतिवादीने सिध्द केले असल्याने, त्याअनुषंगाने प्रतिवादी तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यास पात्र आहेत. करीता मुद्दा क्र. ४ चा निष्कषार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. निशाणी क्रं. १९ कडील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादींना असे निर्देशित करण्यात येते की, दावा जमिनीच्या प्रतिवादीच्या कब्जेवहिवाटीस तसेच दावा वाहनांच्या प्रतिवादीच्या वापरण्यास त्यांनी अगर त्यांच्यामार्फत इतर कोणीही हरकत अडथळा करु नये, अशी तुर्तातुर्त ताकीद देणेत येते.

UMESH PETHE
Digitally signed by UMESH PETHE
Date: 2025.05.06 17:27:34 +0530

दि.०६/०५/२०२५

**( यु. बी. पेठे)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
माळशिरस.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word as per the original Judgment.

(a) Name of the Stenographer : S.T.Korbu

(b) Name of the Court : 2nd Jt. C.J.J.D & J.M.F.C
Malshiras, Dist - Solapur

(c) Order signed by P.O. On : 06-05-2025

(d) Order uploaded on : 06-05-2025